आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१४ ऑगस्ट २०२४ - बुधवार

**ठळक बातम्या**

- ७८ व्या स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू देशवासियांना संबोधित करणार

- देशाच्या फाळणी दरम्यान बलिदान दिलेल्यांचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडून स्मरण

- घरोघरी तिरंगा मोहिमेनिमित्त उत्साहाचं वातावरण, राज्यभरात तिरंगा यात्रांमध्ये नागरिकांचा मोठ्या प्रमाणात सहभाग

- स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने पोलीस, अग्निशमन, होमगार्ड, नागरी सुरक्षा आणि सुधारणा सेवेतल्या कर्मचाऱ्यांना शौर्य आणि सेवा पदकं जाहीर

**आणि**

- चित्रपती व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार जेष्ठ अभिनेते शिवाजी साटम यांना तर राज कपूर जीवनगौरव पुरस्कार जेष्ठ अभिनेत्री आशा पारेख यांना जाहिर

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज ७८ व्या स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला देशवासियांना संबोधित करणार आहेत. आकाशवाणीच्या देशभरातल्या सर्व केंद्रांवरुन तसंच दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवरून संध्याकाळी ७ वाजता हे भाषण आधी हिंदी आणि त्यानंतर इंग्रजी भाषेत प्रसारित केलं जाईल. त्यानंतर दूरदर्शनच्या प्रादेशिक वाहिन्यांवरून प्रादेशिक भाषांमध्ये राष्ट्रपतींचं भाषण प्रसारित होईल. आज रात्री साडे नऊ वाजता हे संबोधन आकाशवाणीवरुन प्रादेशिक भाषांमध्ये प्रसारित केलं जाईल. संध्याकाळी सात वाजता राष्ट्रपतींचं संबोधन प्रसारित होणार असल्यानं आकाशवाणीच्या मुंबई केंद्रावरचं प्रादेशिक

बातमीपत्र आज संध्याकाळी पावणे सात वाजता प्रसारित होईल. **दरम्यान,** स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला संरक्षण मंत्री राजनाथ सिंह सशस्त्र दलांना संबोधित करतील. त्यांचं भाषण आकाशवाणीच्या एफ एम गोल्ड चॅनल आणि इंद्रप्रस्थ चॅनलवर संध्याकाळी ५ वाजून दहा मिनिटाला प्रसारीत केलं जाईल.

**<><><><><>**

देशाच्या फाळणीचं स्मरण आज देशभरात केलं जात आहे. यानिमित्त फाळणीमुळे दुःख भोगलेल्या असंख्य लोकांचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी स्मरण केलं. त्या सर्व लोकांच्या धैर्याला अभिवादन करण्याचा आजचा दिवस असल्याचं प्रधानमंत्र्यांनी आपल्या समाजमाध्यमावरल्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

७८वा स्वातंत्र्य दिनानिमित्त दिल्लीतल्या लाल किल्ल्यावर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी ध्वजारोहण करतील. त्यानंतर ऐतिहासिक तटबंदीवरून ते देशाला संबोधित करतील. यंदाच्या स्वातंत्र्य दिन सोहळ्याची संकल्पना विकसित भारत अशी आहे. स्वातंत्र्य दिन सोहळ्यात सहभागी होण्यासाठी केंद्र सरकारनं देशभरातल्या विशेष पाहुण्यांना आमंत्रित केलं आहे. यामध्ये महाराष्ट्रातल्या १२३ हून अधिक व्यक्तिंचा समावेश आहे. यात विशेष आमंत्रितांसह महिला, युवक, शेतकरी, आदिवासी, क्षेत्रीय अधिकारी आणि विविध सरकारी योजनांचे लाभार्थी, MyGov स्वातंत्र्य दिन प्रश्नमंजुषेचे विजेते आणि नीति आयोगाच्या विशेष आमंत्रितांसह समाजातल्या विविध घटकांचा समावेश असेल.

**<><><><><>**

“हर घर तिरंगा” मोहिमेचा भाग म्हणून केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज त्याच्या नवी दिल्लीतल्या निवासस्थानावर राष्ट्रध्वज फडकवला. कोट्यवधी भारतीयांमधली एकता, एकनिष्ठता आणि अभिमान याचं प्रतीक म्हणजेच तिरंगा, असं त्यांनी आपल्या समाजमाध्यमावरच्या नोंदीमध्ये म्हटलं आहे.

**<><><><><>**

हर घर तिरंगा अर्थात घरोघरी तिरंगा मोहिमेनिमित्त देशभरात उत्साहाचं वातावरण असून, तिरंगा यात्रा, सेल्फी आणि तिरंगा रॅलींचा जल्लोष सुरू आहे. स्वातंत्र्य दिनानिमित्त बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीनं **मुंबईत** 'घरोघरी तिरंगा' अभियान उत्साहात सुरू आहे. मंत्रालय, विधानमंडळ, गेट वे ऑफ इंडिया, छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे स्थानकाची ऐतिहासिक वास्तू, बृहन्मुंबई महानगरपालिकेचं मुख्यालय, शासकीय कार्यालयं, रस्ते अशा प्रमुख ठिकाणी राष्ट्रध्वजाच्या रंगाची आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. **धुळे** शहरात १ हजार १११ फूट लांब तिरंग्यासह तिरंगा यात्रा काढण्यात आली. या यात्रेत शहरातल्या विविध शाळांमधले विद्यार्थी आणि विविध संघटनांचे कार्यकर्ते सहभागी झाले होते. **सांगली, मिरज** आणि **कुपवाड** शहर महानगरपालिकेकडून हर घर तिरंगा अभियानांतर्गत तिरंगा वाहन रॅली काढण्यात आली. रत्नागिरी जिल्हा प्रशासन आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणातर्फे आपत्ती व्यवस्थापना संदर्भात जनजागृतीसाठी आज सकाळी मिनी मॅरेथॉनचं आयोजन करण्यात आलं होतं.

**<><><><><>**

स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने पोलीस, अग्निशमन, होमगार्ड, नागरी सुरक्षा आणि सुधारणा सेवेतल्या एकंदर १ हजार ३७ कर्मचाऱ्यांना शौर्य आणि सेवा पदकांची घोषणा करण्यात आली आहे. तेलंगण पोलीस दलाचे मुख्य कॉन्स्टेबल चडूवू यादय्या यांना राष्ट्रपती शौर्यपदक जाहीर झालं आहे. २१३ कर्मचाऱ्यांना शौर्यपदक, तर ९४ जणांना विशेष सेवेसाठी राष्ट्रपती पदकानं सन्मानित करण्यात येत आहे. यापैकी ७५ कर्मचारी पोलीस सेवेतले, ८ अग्निशमन सेवेतले, ८ नागरी सुरक्षा आणि होम गार्ड सेवेतले, तर ३ सुधारणा सेवेतले कर्मचारी आहेत. ७२९ जणांना प्रशंसनीय सेवेसाठी पदकं जाहीर झाली आहेत. यात महाराष्ट्रातल्या विविध सेवांमध्ये कार्यरत असलेल्या ५९ कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. भारतीय पोलीस

सेवेचे अधिकारी, अतिरिक्त पोलीस महानिरीक्षक अनुज तारे यांना शौर्यपदक जाहीर झालं आहे. तर अतिरिक्त महासंचालक चिरंजीव प्रसाद, संचालक राजेंद्र डहाळे आणि सहायक पोलीस आयुक्त सतीश गोवेकर यांना परमसेवा पदकानं सन्मानित करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

घरोघरी तिरंगा या अभियानात राज्यातले सर्व स्तरातले नागरिक सहभागी होत आहेत. अनेकांनी आपल्या घरी तिरंगा ध्वज फडकावला असून समाज माध्यमावरही तिरंग्याचं चित्र लावलं आहे. मराठी चित्रपटसृष्टीसह विविध क्षेत्रातले मान्यवर यात सहभागी झाले आहेत. घरोघरी तिरंगा अभियानाविषयी प्रसिद्ध शेफ **विष्णू मनोहर** म्हणाले…

**होल्ड--बाईट - विष्णू मनोहर**

**<><><><><>**

शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने चित्रपट सृष्टीसाठी पुरस्कारांची घोषणा आज सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केली आहे. चित्रपती व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ अभिनेते शिवाजी साटम यांना जाहीर झाला आहे. तर राज कपूर जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ अभिनेत्री आशा पारेख यांना जाहीर झाला आहे.

चित्रपती व्ही. शांताराम विशेष योगदान पुरस्कार लेखक, दिग्दर्शक तसेच अभिनेता दिग्पाल लांजेकर यांना जाहीर झाला आहे. तर राज कपूर विशेष योगदान पुरस्कार जेष्ठ लेखक, दिग्दर्शक संकलक एन.चंद्रा यांना जाहीर झाला आहे.

या खेरीज ५८ आणि ५९ व्या महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कारांच्या अंतिम फेरीची नामांकनंही मंत्री मुनगंटीवार यांनी जाहीर केली आहेत. सन २०२०च्या ५८ व्या राज्य चित्रपट महोत्सवाच्या अंतिम फेरीसाठी मी वसंतराव, फास, बापल्योक, गोष्ट एका पैठणीची, बीटर स्वीट कडुगोड, जयंती, चोरीचा मामला, सुमी, फनरल,

गोदाकाठ या दहा चित्रपटांना सर्वोत्कृष्ट चित्रपटाच्या पारितोषिकासाठी नामांकन मिळालं आहे. २०२१ साठीच्या ५९ व्या राज्य चित्रपट महोत्सवाच्या अंतिम फेरीसाठी तिचं शहर होणं, एकदा काय झालं, गोदावरी, फ्रेम, कारखानिंसांची वारी, इरगल, येरे येरे पावसा, बाल भारती, राख, बाईपण भारी देवा या दहा चित्रपटांना सर्वोत्कृष्ट चित्रपटाच्या पारितोषिकासाठी नामांकनं जाहीर झाली आहेत.

**<><><><><>**

राज्यातल्या शेतकरी, गरीब आणि तरुणांना न्याय देणं ही काँग्रेसची भूमिक असून विधानसभेची निवडणूक महाविकास आघाडी म्हणून लढवणार असल्याचं काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी म्हटलं आहे. ते नागपुरात वार्ताहरांशी बोलत होते. महाराष्ट्राच्या स्वाभिमानाचं रक्षण करणं ही काँग्रेसची प्राथमिकता असून महाविकास आघाडीचं सरकार आल्यानंतर मुख्यमंत्रीपदी कोण बसेल याचा निर्णय घेतला जाईल, असं पटोले यांनी सांगितलं.

**<><><><><>**

कोलकाता इथल्या महिला डॉक्टरच्या बलात्कार आणि हत्या प्रकरणाचा तपास सीबीआय कडं सोपवण्याचे आदेश काल उच्च न्यायालयाने दिल्यानंतर निवासी डॉक्टरांच्या राष्ट्रीय संघटना फोर्डा ने देशव्यापी संप मागे घेतला आहे.

मुंबईत मार्डने पुकारलेला संप आजही सुरुच असून मुंबईतल्या केईएम, सायन आणि नायर सारख्या रुग्णालयात डॉक्टर कामावर नाहीत. आपत्कालीन सेवा मात्र सुरुच ठेवल्याची माहिती डॉक्टरांनी दिली आहे.

**<><><><><>**

नवी मुंबई पोलिसांनी सुरू केलेल्या हेल्प लाईनचं आणि व्हॉट्स अप चॅनेलचं उद्घाटन राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी आज केलं.

व्हॉट्सअप चॅनेलद्वारे सायबर गुन्हे, आर्थिक गुन्हे, महिला सुरक्षे संदर्भात जनजागृती करण्यात येणार आहे. हेल्पलाईन आणि व्हॉट्स अप चॅनेलला मिळणारा

लोकांचा प्रतिसाद पाहून हा उपक्रम राज्यभरात लागू करणार असल्याचं शुक्ला यांनी सांगितलं.

**<><><><><>**

दिल्ली अबकारी धोरण घोटाळा प्रकरणी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांचा अंतरिम जामीन सर्वोच्च न्यायालयानं आज फेटाळून लावला. यावर केंद्रीय अन्वेषण विभागानं उत्तर देण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं दिले आणि प्रकरणाची सुनावणी २३ ऑगस्टपर्यंत पुढे ढकलली.

**<><><><><>**

भारत गेल्या वर्षी २३ ऑगस्ट रोजी यशस्वी चांद्रमोहीम राबवणारा चौथा देश आणि चंद्राच्या दक्षिण ध्रुवाच्या परिसरात पोहोचलेला जगातला पहिलाच देश ठरला. या यशाच्या सन्मानार्थ दरवर्षी २३ ऑगस्ट हा दिवस अंतराळ दिवस म्हणून साजरा करण्याची घोषणा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केली आहे.

**<><><><><>**

महिला कुस्तीपटू विनेश फोगाट अपात्रता प्रकरणाचा निकाल क्रीडा न्याय प्राधिकरणानं पुन्हा पुढे ढकलला आहे. आता हा निकाल १६ ऑगस्ट रोजी जाहीर होण्याची शक्यता असल्याचं भारतीय ऑलिम्पिक संघटनेनं म्हटलं आहे. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये ५० किलो वजनी गटात क्युबाची कुस्तीपटू युसनेलिस गुझमान लोपेझ हिच्यासोबत संयुक्त रौप्यपदक आपल्याला देण्यात यावं, अशी मागणी विनेशनं क्रीडा प्राधिकरणाकडे केली होती. सुवर्णपदकाच्या सामन्याच्या दिवशी तिचं वजन १०० ग्रॅम अधिक भरल्यानं तिला स्पर्धेतून अपात्र ठरवण्यात आलं होतं.

**//<><><><><>//**